शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची माहिती

**मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.**

**सेवानिवृत्त अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत**

**<u>कार्यालयाची आवश्यकता :-</u>**

शासकीय व निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना, महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित नियमानुसार सेवा करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणे व नामिकासूची तयार करणे यासाठी खालील पदासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. हे अर्ज ceo_maharashtra@eci.gov.in किंवा anil.valvi@nic.in या ई-मेलवर अथवा कार्यालयीन वेळेत उपरोक्त नमूद कार्यालयीन पत्त्यावर आवश्यक त्या कागदपत्रांसह बंद लिफाफ्यात दिनांक ०४.०५.२०२० पर्यंत पाठवावेत. विहीत मुदतीत न आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता व अनुभव | पद संख्या |
|---|---|---|---|
| १. | अवर सचिव (मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालयाकरीता) | १. उमेदवार शासकीय/निमशासकीय सेवेतून अवर सचिव या पदावरुन सेवानिवृत्त असावा<br>२. उमेदवारास मंत्रालयीन स्तरावरील कामाचा अनुभव असावा.<br>३. निवडणूक संचालन (Conduct of Elections) विषयक कामाचा किमान ३ वर्षाचा अनुभव असावा. | १ |

अटी व शर्ती

१. सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण २७१५/प्र.क्र.१००/१३, दि. १७/१२/२०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार करण्यात येणार आहे.

२. उपरोक्त पदे ही शासन सेवेतील नियमित पदे नाहीत.

३. या पदावरील भरती निव्वळ तात्पुरत्या स्वरूपातील सुरूवातीला १ वर्षाच्या कालावधीसाठी मर्यादीत राहील.

४. सदर पद करार पध्दतीने भरण्यात येईल. उमेदवारास कोणत्याही प्रकारच्या स्थायी पदासाठी दावा करता येणार नाही अथवा हा अनुभव ग्राह्य असणार नाही.

५. या पदावर निवड झालेल्या उमेदवारास शासन सेवेत नियमित करण्याचा कोणताही हक्क राहणार नाही.

६. उमेदवाराचे कामकाज कोणत्याही वेळी असमाधानकारक आढळल्यास <u>मुख्य निवडणुक अधिकारी</u> यांच्या मान्यतेने एक महिन्याची पुर्व सूचना देऊन सेवा समाप्त करण्यात येतील.

७. सदर पदासाठी सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी अर्ज करण्यास पात्र असतील. त्यांना सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ मधील तरतुदी नुसार पारिश्रमिक देय राहील.

८. इतर अटी व शर्ती नियुक्तीबाबतच्या करारान्वये निश्चित करण्यात येतील.

९. कोणतेही कारण न देता अर्ज स्विकारणे अथवा नाकारणे हा अधिकार मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाचा राहील.

(अ.ना. वळवी )
**उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी,**
**महाराष्ट्र राज्य**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : २३ एप्रिल, २०२०**

C:\Users\sneha.manjrekar\Desktop\११११ Manjrekar.docx